महाराष्ट्र शासन
**महसूल व वन विभाग**
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय
नविन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, विधानभवन समोर, पुणे ४११ ००१
दुरध्वनी क्रमांक - ०२०/२६०५०००९ ई-मेल dlrmah.mah@nic.in

---

क्र.भू-१/व्हर्जन २/C.N.२३६४४९६/२०२५ दिनांक :- /११/२०२५

प्रति,

उपसंचालक भूमि अभिलेख,
पुणे, मुंबई, नाशिक, छ. संभाजीनगर,
अमरावती, नागपूर

**विषय:-** राज्यातील सर्व भूमि अभिलेख कार्यालयात एकत्र कुटुंबातील धारण जमिनीच्या हिश्श्यांची मोजणी फी प्रकार लागू करणेबाबत.

उपरोक्त विषयांकितबाबत शासनाद्वारे महाराष्ट्र जमीन महसूल (हद्द व हद्दीच्या खुणा) नियम १९६९ मधील नियम १३(२) मधील तरतुदीस अनुसरून एकत्र कुटुंबातील धारण जमिनीच्या हिश्श्यांची मोजणी फी निश्चित करण्याबाबत "एकत्र कुटुंबाच्या धारण जमिनीचे नोंदणीकृत वाटणी पत्राच्या आधारे विभाजन व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ८५ अन्वये विभाजन / पोट-हिस्सा यासाठी मोजणी फी रू.२००/- प्रति पोट हिस्सा निश्चित करणे", असा प्रस्ताव मान्य करणेत आलेबाबतचे शासनाकडील दि.२२/०५/२०२५ रोजीचे पत्र या कार्यालयास प्राप्त आले आहे.

त्यानुषंगाने एकत्रित कुटुंब पोटहिस्सा मोजणीमध्ये प्रति हिस्सा र.रु.२००/- याप्रमाणे आकारणी करून एकत्रित कुटुंब पोटहिस्सा मोजणी प्रकार ई मोजणी व्हर्जन २.० या आज्ञावलीत अमलात आणणेची कार्यवाही करणेत येणार आहे.

त्याप्रमाणे दिनांक ०७/११/२०२५ पासून राज्यातील सर्व भूमि अभिलेख कार्यालयात एकत्र कुटुंबातील धारण जमिनीच्या हिश्श्यांची मोजणी फी प्रकार प्रत्यक्ष लागू करणेत येत आहे. तरी याबाबतची कार्यवाही तात्काळ करणेबाबत आपल्या अधिनस्त कार्यालयांना सूचना द्याव्यात.

Digitally signed by
Kamlakar Sudhakarrao Hattekar
Date: 11-11-2025 14:31:13

**(कमलाकर हट्टेकर)**
**उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न**
**जमाबंदी आयुक्त (भूमापन) पुणे**

**मा. जमाबंदी आयुक्त, पुणे**
**यांच्या मान्यतेने**